# दि सांगली सॅलरी अर्नर्स को-ऑप.सोसायटी लि., सांगली.

# अर्ज सादर करण्याची प्रक्रिया

सांगली, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यामध्ये कार्यक्षेत्र असलेल्या **दि सांगली सॅलरी अर्नर्स को-ऑप.सोसायटी लि., सांगली** या प्रतिथयश सहकारी संस्थेत खालील दर्शविलेल्या पदाकरिता ऑनलाईन अर्ज मागवण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याची संपूर्ण प्रक्रिया तसेच पदाकरिता आवश्यक त्या शैक्षणिक व इतर अर्हता तसेच इतर तपशील http://tsseco.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

| पदनाम | लिपिक | शिपाई |
|---|---|---|
| पद संख्या | १६ | ६ |
| नेमणुकीचे ठिकाण | संस्थेच्या सर्व शाखा | संस्थेच्या सर्व शाखा |
| वयोमर्यादा | २२ ते ३५ वर्ष (२४/०९/२०२५ पर्यंत वय किमान २२ वर्ष व कमाल ३५ वर्ष ) | २१ ते ३५ वर्ष (२४/०९/२०२५ पर्यंत वय किमान २१ वर्ष व कमाल ३५ वर्ष) |
| शैक्षणिक पात्रता | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>२. MSCIT / समतुल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम<br>प्राधान्य : JAIIB / CAIIB / जी.डी. सी. & ए. उत्तीर्ण, तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची (ICM, IIBF, VAMNICOM ई.) बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका<br>बँका/पतसंस्था किंवा इतर वित्तीय संस्थांमधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य | १२ वी पास |
| दरमहा मानधन | १६६०० /- + इतर भत्ता | १५०००/- + इतर भत्ता |

**अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज व परीक्षा शुल्कासहित सादर करण्याची तारीख | २४/०९/२०२५ सकाळी ११.०० वाजता पासून |
| २. | ऑनलाईन अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख | ०३/१०/२०२५ रात्री ११.५९ पर्यंत |

**ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| १. | **अर्ज करण्याची पद्धत :-**<br>ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना http://tsseco.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे, उमेदवार त्याचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी भरू शकेल. |
| २. | http://tsseco.in या संकेतस्थळावर अर्जदारांनी रजिस्ट्रेशन करावे<br>अर्जदारांनी अर्ज करण्याआधी जाहिराती मधील पद व त्याकरिता लागणारी शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा बघूनच अर्ज भरावा<br>**नोंदणी**<br>रजिस्ट्रेशन करताना स्वताचा आधार नंबर , नाव, वडिलांचे नाव, आडनाव, वैध असलेला मोबाईल नंबर, वैध ई-मेल आयडी भरून रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करावी. |
| ३. | रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यावर समोरील पेज वर USER ID & PASSWORD दिसेल, तसेच अर्ज भरताना नमूद केला गेलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS सुद्धा पाठविला जाईल तो पदभरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत सांभाळून ठेवणे महत्वाचे आहे (User id & Password विसरलात तर संकेतस्थळावर forget user id or password करून पुन्हा मिळवता येईल.) |
| ४. | **पद निवडणे**<br>अर्जदारांनी पद निवडून पुढे जावे |
| ५. | **वैयक्तिक माहिती**<br>अर्जदारांनी वैयक्तिक माहिती मध्ये अर्जदारांचा पत्ता, इत्यादी माहिती अचूक भरावी. |
| ६. | **शैक्षणिक अर्हता**<br>अर्जदारांनी शैक्षणिक अर्हतेची माहिती अचूक भरावी, अर्ज submit करायच्या आधी अर्जदार माहितीमध्ये बदल करू शकतो पण एकदा अर्ज Submit केल्यावर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही किंवा त्याची विनंती मान्य केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ७. | **अनुभव माहिती**<br>अर्जदार त्यांच्याकडे अनुभव असल्यास त्यांनी अनुभवाची माहिती भरून Submit या बटन वर क्लिक करून पुढे जावे. ज्या अर्जदाराकडे अनुभव नाही त्यांनी Skip या बटन वर क्लिक करून पुढे जावे. |

<table>
<tr><td>८.</td><td>

**छायाचित्र व स्वाक्षरी**

<table>
<tr><th>तपशील</th><th>Size Limits</th><th>Details</th></tr>
<tr><td>अर्जदाराचे अलीकडील / नवीन पासपोर्ट छायाचित्र</td><td>JPG/JPEG Format मधील 50KB ते 200 KB पर्यंत</td><td>लांबी x रुंदी प्रमाण (Proportion) ३.५ से.मी. x ४.५ से.मी. असावे. छायचित्राचा ७५% भाग चेहरा असावा.</td></tr>
<tr><td>अर्जदाराची स्वाक्षरी</td><td>JPG/JPEG Format मधील 50KB ते 200 KB पर्यंत</td><td>कोऱ्या पांढऱ्या कागदावर गडद जाड पॉईटच्या पेनेने स्वाक्षरी करावी.</td></tr>
</table>

महत्वाची सूचना: - छायाचित्र व स्वाक्षरी हि स्पष्टपणे दिसेल अशी स्कॅन करून अपलोड करावी. अस्पष्ट छायचित्र व स्वाक्षरी अपलोड केल्यास अर्जदार परीक्षेस अपात्र ठरू शकतात .

</td></tr>
<tr><td>९.</td><td>

**अर्जाची संपूर्ण माहिती**

अर्ज करताना भरलेली संपूर्ण माहिती अर्जदारांना या स्टेप मध्ये पाहता येईल. अर्जदारांना अर्जात काही बदल करावयचा असल्यास Home बटन वर क्लिक करून Edit या Option वर क्लिक करावे. किंवा संपूर्ण अर्ज बरोबर असल्यास अर्जदारांनी Submit बटनवर क्लिक करून पुढे जावे.एकदा अर्ज Submit केल्यावर अर्जदार अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू शकणार नाहीत.

</td></tr>
<tr><td>१०.</td><td>

**परीक्षा शुल्क**

परीक्षा शुल्क भरण्याची सुविधा हि online पद्धतीने असल्याने अर्जदार हे परीक्षा शुल्क QR code च्या माध्यमातून करू शकतात. Online पेमेंट सिस्टम मध्ये अर्जदाराचे परीक्षा शुल्क Update होण्याकरिता ४८ तास ते ७२ तास लागू शकतात. अर्जदारांना याबद्दल काही मदत हवी असल्यास संकेतस्थळावर दिलेल्या Hepline Number वर संपर्क साधावा.

परीक्षा शुल्काविना आलेल्या अर्जांना विचारात घेतले जाणार नाहीत.

</td></tr>
<tr><td>११.</td><td>

**अर्जाची प्रिंट**

परीक्षा शुल्क भरून झाल्यावर अर्जदारांना अर्जाची प्रत व त्या सोबत परीक्षा शुल्क भरल्याची प्रत PDF स्वरुपात मिळेल. अर्जदारांनी पदभरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वतःकडे सांभाळून ठेवावी.

</td></tr>
<tr><td>१२.</td><td>

परीक्षा शुल्क<br>
प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे शुल्क राहील.<br>
(परीक्षा शुल्क विना परतावा राहिल)

</td></tr>
</table>

<table>
<tr><td></td><td>परीक्षा शुल्क :-<br>१. लिपिक पदासाठी रु. ९०० /- + (१८ % जी.एस.टी.) = रु. १०६२ + Applicable Bank Transaction Charges<br>२. शिपाई पदासाठी रु. ६०० + (१८ % जी.एस.टी.) = रु. ७०८ + Applicable Bank Transaction Charges<br>( उमेदवारास प्रत्येक पदासाठी अर्ज व परीक्षा शुल्काचा भरणा करावा लागेल.)</td></tr>
<tr><td>१३.</td><td>१. लिपिक पदी निवड करणेची पद्धत<br>अ) ऑनलाईन परीक्षा - ७५ गुण (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी)<br>ब) प्रत्यक्ष मुलाखत - २५ गुण<br>मुलाखातीसाठीचे १० गुणांची विभागणी खालीलप्रमाणे
<table>
<tr><td>१.</td><td>पदव्युत्तर प्रमाणपत्र</td><td>२ गुण</td></tr>
<tr><td>२.</td><td>GDC & A</td><td>२ गुण</td></tr>
<tr><td>३.</td><td>JAIIB</td><td>२ गुण</td></tr>
<tr><td>४.</td><td>CAIIB</td><td>२ गुण</td></tr>
<tr><td>५.</td><td>IIBF Diploma / ICM /VAMNICOM</td><td>२ गुण</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>१० गुण</td></tr>
<tr><td></td><td>प्रत्यक्ष मुलाखत</td><td>१५ गुण</td></tr>
<tr><td></td><td>एकत्रित</td><td>२५ गुण</td></tr>
</table>
<br>२.शिपाई पदी निवड करणेची पद्धत<br>अ) ऑनलाईन परीक्षा - ५० गुण (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी)<br>ब) प्रत्यक्ष मुलाखत - ५० गुण</td></tr>
</table>

## महत्वाच्या सूचना

➢ परीक्षा शुल्क संकेतस्थळावर अद्ययावत केल्यानंतर अर्ज सादर (Final Submission) केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही. तसेच अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर अर्जाची प्रिंट काढून पुढील प्रक्रीयेसाठी सोबत ठेवावी.

➢ उमेदवाराकडे वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक असावा, जो निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध आणि सक्रीय असयला हवा. तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रियेदरम्यान त्यादवारे पाठवल्या जाणार्या सूचना ,संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील,तसेच ई-मेल आयडी व संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना संस्था जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रेये दरम्यान संस्थेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अवलोकन करून भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

➢ उमेदवारांनी अर्ज भरतांना संबंधित पदांसाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करूनच अर्ज भरावा.

➢ ऑनलाइन अर्जामध्ये उमेदवाराने त्याचे पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक राहील ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास काही त्रुटी राहिल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेद्वाराची राहील व याबाबत उमेदवारास कुठेही व कोणत्याही प्रकारे तक्रार करता येणार नाही. ऑनलाइन अर्जात भरलेली माहिती अर्ज एकदा सादर केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

➢ सदर भरती प्रक्रीयेदरम्यान संकेतस्थळावर असलेल्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन व पालन करून भरती प्रक्रियेची अद्यावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

➢ इच्छुक उमेदवारांनी अर्जातील माहिती पूर्ण भरून वैध ई-मेल आयडी सह विहित मुदतीत नोंदणी करावी.

➢ उमेदवारांची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा हि ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी / छाननी न करता घेण्यात येणार असल्याने, या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांना निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी व तपासणी नंतरच त्याची वैधता पाहून उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार संस्थेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारांना कोणतीही तक्रार करता येणार नाही.

➢ उमेदवारांना परीक्षा / कागदपत्रे पडताळणी व प्रत्येक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. आवश्यक असलेल्या पदांसाठी पात्र उमेदवारांची व्यक्तिगत मुलाखत घेण्यात येईल.

➢ कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना त्यांचे परीक्षा शुल्क परत दिले जाणार नाही.

➢ परीक्षेस पात्र उमेदवारांची माहिती जसे परीक्षेचे ठिकाण व दिनांक, परीक्षेचे स्वरूप ई. संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. परीक्षेस पात्र उमेदवारांना परीक्षा प्रवेश पत्र भरती प्रक्रियेच्या संकेत स्थळावर प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील या व्यतिरिक्त स्वतंत्र कुठल्याही प्रकारे परीक्षा प्रवेश पत्र उमेदवारास दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

➢ ऑनलाइन परीक्षा झाल्यानंतर 48 तासाच्या आत उत्तरतालिका संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. त्यासंबंधी काही आक्षेप असल्यास उत्तरतालिका प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील तीन दिवसांच्या आत संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या नमुन्यानुसार लेखी पत्राने कळवणे आवश्यक राहील. त्यानंतर आवश्यकता असल्यास योग्य तो बदल करून सुधारित उत्तरसुची संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. याबाबत संस्थेचा निणर्य अंतिम राहील तसेच मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

➢ मुलाखतीचे वेळापत्रक उमेदवारांना संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

➢उमेदवाराने अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असावा. सदर माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढळल्यास सदर उमेदवाराचा अर्ज नोकर भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येइल याची कृपया नोंद घ्यावी.

➢ भरती प्रक्रियेत / निवड कार्यपद्धतीत बदल करण्याचा अधिकार संबंधित संस्थेस असेल व ऐनवेळी त्यात काही बदल झाल्यास तो संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना पत्राने / लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

➢ सदर जाहिरातीमध्ये नमूद पदांची संख्या संस्थेच्या आवश्यकतेनुसार कमी / जास्त होऊ शकते. नोकर भरती विषयक सर्वाधिकार संस्था राखून ठेवत असून संपूर्ण अथवा अंशतः भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार देखील संस्था राखून ठेवत आहे.

(स्वाक्षरी)